# मेट्रो-३ प्रकल्पातील १९ वा बोगदा पूर्ण

## विधान भवन ते चर्चगेट भुयारीकरणाचे काम ९० दिवसांत

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. ३ : मेट्रो-३ भूमिगत मार्गाच्या कामाला आणखी वेग आला असून, १९ व्या बोगद्याचे काम गुरुवारी (ता. ३) पूर्ण झाले. सूर्या-१ बोगदा खोदकाम यंत्राने (टीबीएम) विधान भवन ते चर्चगेट स्थानकादरम्यान ४९९ मीटरचे भुयारीकरण ९० दिवसांत पूर्ण केले. सूर्या-१ हे वैतरणा-१ आणि वैनगंगा-१ यांच्यानंतर मेट्रो-३ भुयारीकरणाचे काम पूर्ण करणारे तिसरे टीबीएम ठरले आहे.



कुलाबा-वांद्रे-सीप्झ संपूर्ण मार्गावरील एकूण ५५ किलोमीटर भुयारीकरणाचे काम टीबीएमद्वारे केले जात असून, आतापर्यंत ३२ किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे. भुयारीकरणाचे काम १७ टीबीएमद्वारे केले जात आहे. टनेल बोअरिंग मशीन जमिनीखाली नेण्यासाठी कफ परेड, इरॉस चित्रपटगृह, आझाद मैदान, शीव, सिद्धिविनायक मंदिर, नयानगर, बीकेसी, विद्यानगरी, पाली मैदान, सारीपुत, सहार रोड आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-२ परिसरात विवरे (शाफ्ट) तयार करण्यात आली आहेत. कुलाबा-वांद्रे-सीप्झ पहिल्या भुयारी मेट्रो-३ मार्गातील आझाद मैदान ते मुंबई सेंट्रलपर्यंत ३.८१२४ किमीचे भुयारीकरण सप्टेंबरमध्येच पूर्ण झाले. त्यामुळे 'डाऊनलाईन' बोगदा पूर्ण करणारी मेट्रो-३ प्रकल्पातील वैतरणा-१ पहिली टनेल बोअरिंग मशीन ठरली.

### सात भागांत काम

**प्रकल्पाचे काम एकूण सात भागांत होणार आहे. सिद्धिविनायक मंदिर ते धारावी असा सर्वांत मोठा टप्पा आहे. त्या भागात ११.०२ किलोमीटरच्या भुयारीकरणातील ६.८९ किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे. कफ परेड ते सीएसएमटी पहिल्या 'पॅकेज'मधील ५.८९ किलोमीटरमधील ३.२१ किलोमीटरचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे.**